**नि.क्र. ३ वरील आदेश**
(पारीत दि.०५.०१.२०२४)

०१. प्रस्तुतचा अर्ज अर्जदार नितीन राजु वारंगे, रा. महागांव कसबा ता. दारव्हा जि. यवतमाळ यांनी त्यांच्या मालकीचे जप्त असलेली टिव्हीएस स्कुटी दुचाकी वाहन ज्याचा नोंदणी क्रमांक MH29 AS 3923, चेसिस क्रमांक MD626CG48E2L18079 इंजिन क्रमांक CG4LE2028766 हि सुप्रतनाम्यावर मिळण्याकरीता सादर केला आहे.

०२. अर्जदार यांनी सादर केले आहे की, त्यांचे वर नमुद वाहन अपराध क्र. ८९५/२०२३, कलम ६५ (ई), (अ) महाराष्ट्र दारुबंदी कायद्या अंतर्गत पोलीस स्टेशन, दारव्हा यांनी जप्त केले. सदरचे वाहन हे त्यांच्या मालकीचे असून दैनंदीन वापरात ते आणतात. त्यांना त्या वाहनाचा ताबा न मिळाल्यास त्यांचे नुकसान होईल. त्यामुळे त्यांना त्या वाहनाचा सुप्रतनाम्यावर तात्पुरता ताबा देण्यात यावा अशी विनंती केली.

०३. सदरील अर्जास आरोपीने आपले म्हणणे नि.क्र. ०३ खाली दाखल केले असून उपरोक्त नमुद वाहन क्रमांक असलेली दुचाकी हे अर्जदाराच्या मालकीचे असुन ते सुपुर्तनाम्यावर अर्जदारास देण्यास त्यांची कोणतीही हरकत नसल्याचे सांगितले. सरकारी अभियोक्ता यांनी नि.क्र. ३ खाली त्यांचे म्हणणे दाखल करुन प्रस्तुतचा अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली.

०४. अर्जाचे, उत्तरांचे आणि दस्ताऐवजांचे अवलोकन केले. अर्जदाराने स्वतःचे आधार कॉर्डची पडताळणी केलेली प्रत दाखल केली आहे. त्यात तो महागांव कसबा पो. अर्जुना ता. दारव्हा जि. यवतमाळ येथील रहिवासी असल्याचे निदर्शनास येते. अर्जदाराने वाहन नोंदणी तपशिलाची पडताळणी केलेली प्रत दाखल केलेली असून त्यातील नमुद वाहन हे अर्जदाराच्या नावे मालक म्हणून दर्ज असल्याचे आढळते. त्यामुळे अर्जदार हा जप्त केलेल्या वाहनाचा मालक असल्याचे प्राथमीकदृष्टया निष्पन्न होते. अर्जदाराच्या व्यतिरिक्त इतर कोणीही जप्त केलेल्या वाहनाबाबत हक्क प्रस्थापीत केलेला नाही व अर्जदाराच्या हक्काला आक्षेप वा उजर नोंदविलेला नाही. अर्जदाराने सदर वाहनावर त्याचा हक्क सिद्ध केल्याने तो अंतरीमरित्या त्या वाहनाच्या ताब्यास पात्र ठरतो मात्र अर्जदाराने वाहनाचे विमा प्रमाणपत्राची प्रत अभिलेखावर दाखल केली नाही त्यामुळे

त्याला त्याबाबत निर्देश देण्यात येतात. याप्रकारे अर्जदाराचा अर्ज खालील आदेशाप्रमाणे निकाली काढण्यात येतो :–

## आ दे श

१. अर्जदाराचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. अर्जदार नितीन राजु वारंगे, रा. महागांव कसबा ता. दारव्हा जि. यवतमाळ यांनी त्यांच्या मालकीचे जप्त असलेली टिव्हीएस स्कुटी दुचाकी वाहन ज्याचा नोंदणी क्रमांक MH29 AS 3923, चेसिस क्रमांक MD626CG48E2L18079 इंजिन क्रमांक CG4LE2028766 हि सुप्रतनाम्यावर अंतरीमरित्या मिळण्यास पात्र आहे व त्याला वर नमुद चेसिस आणि इंजिन क्रमांक च्या तपासणी नंतर वाहन ताब्यात द्यावे.

३. अर्जदार नितीन राजु वारंगे, रा. महागांव कसबा ता. दारव्हा जि. यवतमाळ, हा वाहन मिळाल्यानंतर त्या वाहनाच्या रंगात कुठलाही बदल करणार नाही, ते वाहन हस्तांतरण करणार नाही, कुठल्याही गुन्हयात वापरणार नाही व आदेशान्वये ते वाहन न्यायालयासमक्ष प्रस्तुत करेल अशी हमी घेवून त्याबाबत हमीपत्र (Indemnity Bond) रुपये १,१०,०००/– दाखल करेल.

४. अर्जदार हा जप्त असलेल्या वाहनाचे चहुबाजुंनी छायाचित्र स्वखर्चाने गैरअर्जदारांना काढून देईल व गैरअर्जदाराने ते दोषारोपपत्रासोबत दाखल करावे. अर्जदार वाहनाचे विमा प्रमाणपत्र दाखल करावे.

५. प्रस्तुतचा अर्ज निकाली काढण्यात येतो आणि प्रस्तुत प्रकरणातील सर्व दस्ताऐवज हे दोषारोपपत्राबरोबर जोडण्यात यावे. हमदस्त देण्यात येतो.

(एम.एम. कल्याणकर)
दिनांक :– ०५.०१.२०२४ न्यायदंडाधिकारी (प्रथम श्रेणी)
दारव्हा.